**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**
**प्रेसनोट दिंनाक: २९/११/२०२२**

---

**गुन्हयामधील जप्त केलेले सोने–चांदीचे दागिने, चारचाकी व दुचाकी वाहन, मोबाईल व नगदी रक्कम असा किंमती मुद्देमाल पोलीस अधीक्षक यांनी सन्मानाने फिर्यादीस केला परत.**

दिनांक २९/११/२०२२ रोजी पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी गुन्हयातील जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादी यांना परत करणेकरीता **'जप्त किंमती मुद्देमाल निर्गती विशेष मोहिम'** राबविण्याचे ठरविले. याबाबत जिल्हयातील सर्व ठाणेदार व मुद्देमाल मोहरर यांना निर्देश दिले की, आपआपले पो.स्टे. मधील गुन्हयातील जप्त किंमती मुद्देमालाचे पडताळणी करून त्याची न्यायालयातून संपुर्ण योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून व फिर्यादी यांना सुपर्द करणेकरीता सुपर्दनामा तयार करावा.

जिल्हयातील सर्व किंमती मुद्देमालाची न्यायालयातून कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून फिर्यादी यांना मुद्देमाल परत करणेकरीता आयोजित केलेल्या विशेष मोहीमेमध्ये 'प्रेरणा सभागृह' पोलीस मुख्यालय, यवतमाळ येथे जिल्हयातील पो.स्टे. मधील मुद्देमाल मोहरर यांना बोलावून फिर्यादी यांना निमंत्रित केले व चारचाकी व दुचाकी चाहनाच्या चाव्या, सोने–चांदीचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांनी सन्मानाने मंचावर बोलावून मुद्देमाल मोहरर यांचे सोबत फिर्यादीस परत केले. सदर कार्यक्रमास डॉ. पवन बन्सोड, पोलीस अधीक्षक व श्री. पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक यांनी मुद्देमाल मोहरर व फिर्यादी यांना मुद्देमालाचे महत्व समजावून सांगीतले. पोलीस अधीक्षक यांनी संबोधीत करीत पो.स्टे. मधील सर्व ठाणेदार व दुय्यम अधिकारी तसेच मुद्देमाल मोहरर, पोलीस अंमलदार व फिर्यादी यांचा सन्मान केला. गुन्हयातील चोरी गेलेला मुद्देमाल पोलीसांना मिळविणे सोपे नसून त्यांना बंदोबस्त, निवडणूक कर्तव्य, गुन्हे तपास व इतरही महत्वाचे कर्तव्य पार पाडीत असतांना फिर्यादींच्या भावनांची कदर करीत सर्व किंमती वस्तू व्यवस्थितरित्या काळजी पुर्वक जसाचा–तसा परत आणण्याकरता कसोशिने प्रयत्न करून त्यासंदर्भात फिर्यादी यांच्या भावना जोपासून मुद्देमाल मिळवावा लागतात व त्याची जपवनूक करावी लागते. सर्व फिर्यादी यांच्या भावना आपले वाहन, सोने–चांदीचे दागीने व मोबाईल या संदर्भात जोडलेल्या असतात. फिर्यादी यांच्या मोबाईल मधील आपले कुटूंबातील सदस्यांचे असलेले फोटो/व्हिडीओ व इतरही महत्वाचा गोपनीय डाटा असलेला मोबाईल डाटासह परत देणे एक अशक्यप्राय गोष्ट असतांना सुध्दा प्रयत्नांची पराकाष्टा करीत काळजी घेत तो संपुर्ण परत कसा देता येईल याची चिंता पोलीसांना असते ही कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो.

पोलीसांनी किंमती मुद्देमाल फिर्यादी यांना परत केल्या नंतर जनमानसात पोलीसांप्रती आदर वाढून त्यांची प्रतिमा नक्कीच उंचावली असे मत व्यक्त केले. तसेच श्री. पियुष जगताप, अपर पोलीस अधीक्षक यांनी उपस्थित नसलेल्या सर्व फिर्यादी यांना आवाहन केले की, यापुढेही अशीच प्रक्रिया डिसेंबर २०२२ मध्ये सुरू करून सदरची मोहीम जानेवारी २०२३ मध्ये राबवून फिर्यादी यांना सर्व किंमती मुद्देमाल कायदेशिर कार्यवाही पुर्ण करून परत केल्या जाईल असे मत व्यक्त केले.

यवतमाळ जिल्हयातील **'जप्त किंमती मुद्देमाल निर्गती मोहिम'** अंतर्गत एकुण ११ पोलीस स्टेशन चे किंमती मुद्देमाल खाली प्रमाणे फिर्यादी यांना सन्मानाने परत करण्यात आला.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | किंमती मुद्देमालाचे विवरण | एकुण संख्या | किंमती मुद्देमालाची अंदाजे एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | यवतमाळ शहर | मोटर सायकल<br>मोबाईल | — १ नग<br>— २ नग | रू. ४२,०००/— |
| २ | अवधुतवाडी | सोने<br>मोबाईल | — १ नग<br>— ९ नग | रू. १,९०,०००/— |
| ३ | यवतमाळ ग्रामीण | मोटर सायकल<br>मोबाईल | — २ नग<br>— १ नग | रू. ६५,०००/— |
| ४ | बाभुळगांव | सोने | — २ नग | रू. ९,५७५/— |
| ५ | कळंब | मोटर सायकल<br>मोबाईल | — १ नग<br>— १ नग | रू. ४१,३००/— |
| ६ | नेर | चारचाकी वाहन<br>मोबाईल<br>नगदी नक्कम | — १ नग<br>— १ नग<br>रू. १,६००/— | रू. ५,०८,६००/— |
| ७ | आर्णी | सोने व चांदी | — ३ नग | रू. ८७,७४४/— |
| ८ | लाडखेड | सोने | — ६ नग | रू. ७,७०९/— |
| ९ | पुसद ग्रामीण | सोने | — १ नग | रू. २२,५००/— |
| १० | पांढरकवडा | सोने | — १६ नग | रू. ४,६६,५८०/— |
| ११ | घाटंजी | नगदी नक्कम | रू. ८,००,०००/- | रू. ८,००,०००/— |
| | **एकूण अंदाजे किंमत** | | | **रू. २२,४१,००८/—** |

सदरची मोहीम यशस्वी पार पाडण्याकरीता डॉ.पवन बन्सोड, पोलीस अधीक्षक यवतमाळ व श्री. पियुष जगताप, अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे मार्गदर्शनत जिल्हयातील पोलीस स्टेशनचे सर्व ठाणेदार, दुय्यम अधिकारी, मुद्देमाल मोहरर, अपर पोलीस अधीक्षक यांचे वाचक सपोनि श्रीकांत कडू व पोलीस अंमलदार पो.कॉ./बन १३०१ अरविंद चेमटे यांनी मोहीम योग्यरिता माहिती संकलीत करून पार पाडली.

**( पियुष वि. जगताप )**
अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ.